महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्र. ०२२-२२०१४४१९
Email : neela.ranade@nic.in

क्र. जीपीडीपी-२०१९/प्र.क्र.६६/पंरा- ६
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१.
दिनांक :- १९ सप्टेंबर, २०१९.

प्रति,

१. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव ( वित्त / नियोजन /ग्राम विकास / जलसंधारण / जलसंपदा/ महसूल व वन / महिला व बाल विकास /आदिवासी विकास / सामाजिक न्याय / सार्वजनिक आरोग्य / पाणी पुरवठा /सार्वजनिक बांधकाम /शालेय शिक्षण/ कृषी व पदुम / गृह / उर्जा)
२. विभागीय आयुक्त ( सर्व विभाग )
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ( सर्व )
४. जिल्हाधिकारी ( सर्व )
५. राज्य प्रकल्प संचालक, राज्य प्रकल्प व्यवस्थापक कक्ष ( राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान), ए-९, शिवसागर अपार्टमेंट, मोदीबाग, गणेशखिंड रोड, शिवाजीनगर, पुणे - ४११०१६.
६. माहिती व तंत्रज्ञान कक्ष, ग्रामविकास विभाग, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई.
७. सह सचिव / उप सचिव ग्राम विकास विभाग ( सर्व )
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, एम.एस.आर.एल.एम., ५ वा मजला, साऊथ विंग, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.
९. संचालक, राज्य ग्रामविकास संस्था, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे ४११ ००७.

विषय - "सबकी योजना सबका विकास" - People's Plan Campaign for Gram Panchayat Development Plan (GPDP) - मोहीम राबविणेबाबत
(२ ऑक्टोबर, २०१९ ते ३१ डिसेंबर, २०१९)

संदर्भ - १) मा.सचिव, पंचायतीराज मंत्रालय, भारत सरकार यांचे मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांना लिहिलेले अ.शा.पत्र क्र. M-११०१५/१५९/२०१९-CB, दि. १६/०७/२०१९
२) मा.संयुक्त सचिव, पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार यांचे मा. प्रधान सचिव, ग्राम विकास यांना लिहिलेले अ.शा.पत्र क्र. M-११०१५/१९२/२०१९-CB, दि. ०८/०८/२०१९
३) मा. सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांचे अ.शा.पत्र क्र. Q-१६०१४/०१/२०१९-AL (RD) (e३६७९०४) दि. २२/०८/२०१९

महोदय/महोदया,

केंद्र शासनाच्या ग्राम विकास व पंचायती राज मंत्रालयाने "सबकी योजना सबका विकास" लोकसहभागातून जनतेचा/ग्रामस्थांचा ग्रामपंचायत विकास आराखडा ही मोहीम दिनांक २ ऑक्टोबर, २०१९ ते ३१ डिसेंबर, २०१९ या कालावधीत राबविणेचे निश्चित केलेले आहे. या मोहीमे अंतर्गत राज्य शासनाच्या विविध विभागांचा सहभाग, विविध विभागांमार्फत ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये राबविण्यात येत असलेल्या केंद्र व राज्य शासनाच्या विकास योजनांचे अभिसरण करून सन २०२०-२१ चा ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करावयाचा आहे.

सन २०२० ते २०२५ या कालावधीचा पंचावार्षिक ग्रामपंचायत विकास आराखडा व सन २०२०-२१ चा वार्षिक ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करणेबाबत राज्य शासनाच्या ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र. जीपीडीपी-२०१९/प्र.क्र.३८/पंरा-६, दि. २८ मे, २०१९ अन्वये सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित करणेत आलेल्या आहेत. या सूचनांच्या

अंमलबजावणी बरोबरच केंद्र शासनाच्या "सबकी योजना सबका विकास" या मोहीमेचा विचार करून ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करण्याची प्रक्रिया व वेळापत्रकाची सांगड मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घालावयाची आहे. "सबकी योजना सबका विकास" या मोहीमे अंतर्गत ७३ व्या राज्य घटना दुरूस्ती अन्वये अनुसूची ११ मध्ये नमुद केलेल्या २९ विषयांची जबाबदारी पंचायतराज संस्थांकडे सोपविण्यात आलेली असल्यामुळे या सर्व २९ विषयांशी संबंधीत राज्य शासनाचे विभागांनी ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होणे अपेक्षित असून त्यानुसार दिनांक २८ मे, २०१९ च्या शासन निर्णयाद्वारे सूचना निर्गमित केलेल्या आहेत. "सबकी योजना सबका विकास" या मोहीमेच्या मार्गदर्शक सूचना सोबत जोडल्या आहेत. या मोहीमे अंतर्गत राज्य व जिल्हा स्तरावर विविध विभागांची जबाबदारी व वेळापत्रक खालीलप्रमाणे राहील.

१) ग्राम विकास विभाग

| | | |
|---|---|---|
| १. | शक्ती प्रदत्त समिती (Empowered Committee) ची स्थापना करणे | |
| २. | राज्य स्तरावर "सबकी योजना सबका विकास" मोहीमेसाठी, मिशन अंत्योदय अंतर्गत पायाभुत सर्वेक्षण आणि माहिती तंत्रज्ञान संबंधीत कामासाठी नोडल अधिकारी नियुक्त करणे. | दि. ०५ सप्टेंबर, २०१९ |
| ३. | राज्य घटनेच्या अनुसूची ११ मध्ये नमुद २९ विषयांशी संबंधीत विभागांनी राज्य स्तरीय नोडल अधिकारी नियुक्त करणेबाबत संबंधीत विभागांकडे पाठपुरावा करणे. | दि. ०५ सप्टेंबर, २०१९ |
| ४. | राज्य स्तरावर राज्य घटनेच्या अनुसूची ११ मध्ये नमुद २९ विषयाशी संबंधीत सर्व विभागांची बैठक घेणे | दि. ०५ सप्टेंबर, २०१९ |
| ५. | या सर्व नोडल अधिका-यांनी www.gpdp.nic.in या वेब पोर्टलवर नोंदणी करणेबाबत सूचना देणे. | दि. ०५ सप्टेंबर, २०१९ |

२) राज्य शासनाचे विविध विभागाचे नोडल अधिकारी

| | | |
|---|---|---|
| १. | राज्य शासनाच्या विविध विभागाच्या नोडल अधिका-यांनी त्यांच्या विभागासाठी जिल्हा निहाय जिल्हा नोडल अधिका-यांची नियुक्ती करून मुख्य कार्यकारी अधिका-यांना कळविणे. | दि. ०५ सप्टेंबर, २०१९ |
| २. | जिल्हा नोडल अधिका-यांनी ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करण्यासाठी आयोजित करण्यात येणा-या दिनांक २ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर, २०१९ या कालावधीतील प्रत्येक ग्रामपंचायतीच्या विशेष ग्राम सभांना उपस्थित राहणा-या ग्राम / तालुका स्तरीय वा अन्य अधिकारी / कर्मचा-यांची नियुक्ती करणे व त्यांची नावे वेब पोर्टलवर अपलोड करणे. | दि. १० सप्टेंबर, २०१९ |
| ३. | ग्रामपंचायत निहाय विशेष ग्रामसभेस उपस्थित राहणेसाठी नियुक्त केलेल्या विविध विभागाच्या अधिकारी / कर्मचा-यांची नावे वेब पोर्टलवर अपलोड करणे. | दि. १० सप्टेंबर, २०१९ |
| ४. | नियुक्त केलेल्या या अधिकारी / कर्मचा-यांनी त्यांना नेमुन दिलेल्या ग्रामपंचायतींच्या ग्राम सभांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार उपस्थित राहणेबाबत सूचना देणे. | दि. १५ सप्टेंबर, २०१९ |

| | | |
|---|---|---|
| ५. | ग्राम सभेमध्ये संबंधीत विभागामार्फत अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती सोबत जोडलेल्या नमुन्यात (परिशिष्ट-१) लेखी स्वरूपामध्ये ग्रामपंचायतीस देवून त्याचे सादरीकरण ग्रामसभेमध्ये करणेबाबत सूचना देणे. | संबंधीत ग्रामपंचायतीची विशेष ग्राम सभा (२ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर, २०१९) |

३) राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, पुणे

| | | |
|---|---|---|
| १. | सन २०२०-२१ या वर्षाचा ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करणेबाबतच्या मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे. | दि. ३१ ऑगस्ट, २०१९ |
| २. | राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करण्यासाठी प्रस्तावित केलेले प्रशिक्षण व क्षमता बांधणी उपक्रम मुदतीत पूर्ण करण्यासाठी सनियंत्रण करणे. | दि. ३० सप्टेंबर, २०१९ पर्यंत |
| ३. | ग्रामपंचायत विकास आराखड्यासाठी विशेष ग्रामसभांचे वेळापत्रक मुख्य कार्यकारी अधिका-या मार्फत निश्चित करणे. | दि. १५ ते ३० सप्टेंबर, २०१९ |
| ४. | या विशेष ग्रामसभांपूर्वी राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतीने घ्यावयाच्या तीन ग्रामस्तरीय सभांचे नियोजन व वेळापत्रक मुख्य कार्यकारी अधिका-या मार्फत निश्चित करून घेणे. | दि. १५ ते ३० सप्टेंबर, २०१९ |
| ५. | ग्रामपंचायत विकास आराखडे विहित मुदतीत तयार करून अंतीम करण्याच्या दृष्टीने ग्रामसभांचे सनियंत्रण करणे. | सप्टेंबर ते डिसेंबर, २०१९ |

४) राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा, पुणे

| | | |
|---|---|---|
| १. | ग्रामपंचायत विकास आराखड्यासाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी याप्रमाणे एकूण १३६ प्रमुख प्रविण प्रशिक्षकांना आणि प्रत्येक जिल्ह्यातील २ उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रशिक्षित करणे. | दि. २५ मे, २०१९ पर्यंत |
| २. | महाराष्ट्र ग्रामीण जिवनोन्नती अभियान (MSRLM) मार्फत नियुक्त केलेल्या Facilitator च्या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण मोड्यूल तयार करणे. | |
| ३. | ग्रामपंचायत विकास आराखडा (GPDP) अंतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमासाठी नोडल अधिकारी म्हणून काम पाहणे. | |

५) माहिती तंत्रज्ञान कक्ष, ग्राम विकास विभाग

| | | |
|---|---|---|
| १. | राज्यस्तरीय विविध विभागांच्या नोडल अधिका-यांची नावे वेब पोर्टलवर अपलोड करणे. | दि. ०५ सप्टेंबर, २०१९ |
| २. | वेब पोर्टलवर नोंदणी, जिओ-टॅगिंग फोटोग्राफ आणि प्लॅन प्लस वरील नोंदी यासाठी राज्य स्तरावर नोडल अधिकारी | दि. ०५ सप्टेंबर, २०१९ |

| | | |
|---|---|---|
| | म्हणून काम पाहणे. त्याचप्रमाणे यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर नोडल अधिका-यांची नियुक्ती करणे. | |
| ३. | ग्रामसभा बैठकीचे व माहिती फलकाचे (PIB) जिओ-टॅग फोटोग्राफ अपलोड करणेबाबत सनियंत्रण करणे | दि. २ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर, २०१९ |
| ४. | ग्रामपंचायत विकास आराखडे प्लॅन प्लस वर अपलोड करणेबाबत सनियंत्रण करणे. | दि. २ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर, २०१९ |
| ५. | केंद्र शासनाने ग्रामपंचायतीसाठी विकसीत केलेल्या विविध आज्ञावली अद्ययावत ठेवणेबाबत सनियंत्रण करणे. | दि. २ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर, २०१९ |

६) महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान (MSRLM) कक्ष, नवी मुंबई

| | | |
|---|---|---|
| १. | मिशन अंत्योदय अंतर्गत पायाभुत सर्वेक्षण, ग्रामपंचायतनिहाय Facilitator च्या नियुक्त्या, Facilitator चे प्रशिक्षण यासाठी राज्य स्तरावर नोडल अधिकारी म्हणून काम पाहणे. त्याचप्रमाणे यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर नोडल अधिका-यांची नियुक्ती करणे. | दि. २९ ऑगस्ट, २०१९ |
| २. | प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी Facilitator ची नियुक्ती करणे. | दि. ०५ सप्टेंबर, २०१९ |
| ३. | नियुक्त केलेल्या Facilitator चे प्रशिक्षण पूर्ण करणे. त्यासाठी राज्य ग्रामीण विकास संस्थेकडून प्रशिक्षण मोड्यल प्राप्त करून घेणे. | दि. ०५ सप्टेंबर, २०१९ |
| ४. | Facilitator मार्फत बेसलाईन सर्वे पूर्ण करून घेणे (MA Mobile App), Poverty Reduction Plan तयार करून ग्रामसभेत मांडणे तसेच ग्रामसभेमध्ये अनु.जाती-जमाती, महिला, अपंग इ. वंचीत घटकांचा सहभाग करून घेणे आणि विहित नमुन्यातील अहवाल सादर करणे या सर्व कामकाजाचे सनियंत्रण करणे. | सप्टेंबर ते डिसेंबर, २०१९ |
| ५. | मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निश्चित केलेले ग्रामसभांचे वेळापत्रक आणि Facilitators च्या नियुक्त्या, प्रशिक्षण व सर्वेक्षण याबाबींची सांगड घालणे. ग्रामसभेमध्ये Facilitator ने सक्रियपणे सर्व जबाबदा-या पार पाडणेबाबत सनियंत्रण करणे. | मोहिम कालावधी |

७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

| | | |
|---|---|---|
| १. | "सबकी योजना सबका विकास" या मोहीमेच्या अंमलबजावणीची संपूर्ण जबाबदारी पार पाडणे. | मोहिम कालावधी |
| २. | सन २०२० ते २०२५ चा पंचवार्षिक आराखडा व सन २०२०-२१ चा वार्षिक ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करणेबाबतच्या निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना व या मोहीमेची सांगड घालून अंमलबजावणी करणे. | मोहिम कालावधी |

| | | |
|---|---|---|
| ३. | ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करण्यासाठी शासन निर्णय दिनांक २८ मे, २०१९ नुसार प्रस्तावित केलेले जिल्हा, तालुका आणि गणस्तरावरील प्रशिक्षण उपक्रम मुदतीत पुर्ण करणे. | दि. ३० सप्टेंबर, २०१९ पूर्वी |
| ४. | जिल्हा परिषदेच्या प्रत्येक विभागांसाठी नोडल अधिका-याची नियुक्ती करणे. | दि. ०५ सप्टेंबर, २०१९ |
| ५. | जिल्हास्तरावर राज्य शासनाच्या सर्व विभागांच्या नियुक्त केलेल्या नोडल अधिकारी आणि जिल्हा परिषदेच्या नोडल अधिका-याची बैठक घेवून त्यांची भुमिका स्पष्ट करून ग्रामसभेमध्ये विहित नमुन्यातील (परिशिष्ट-१) माहिती उपलब्ध करून देवून व सादरीकरण करणेबाबत सूचना देणे व सर्व खात्यांचा समन्वय साधणे. | दि. ०५ सप्टेंबर, २०१९ |
| ६. | जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीमध्ये ग्रामपंचायत विकास आराखडा निश्चित करण्यासाठी २ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर, २०१९ या कालावधीमध्ये विशेष ग्रामसभांचे आयोजन करणे. | मोहिम कालावधी |
| ७. | या विशेष ग्रामसभांच्या आधी प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानामध्ये प्रस्तावित केलेल्या तीन सभांचे (महिला, वंचीत घटक व बालसभा) आयोजन करणे. | मोहिम कालावधी |
| ८. | विशेष ग्रामसभा व त्या आधीच्या तीन ग्रामस्तरीय सभांचे ग्रामपंचायतनिहाय वेळापत्रक निश्चित करून त्यास स्थानिक स्तरावर प्रसिध्दी देणे. | दि. १५ सप्टेंबर, २०१९ |
| ९. | या विशेष ग्रामसभेसाठी जिल्हा परिषदेसह राज्य शासनाच्या विविध विभागांचे अधिकारी / कर्मचारी उपस्थित राहणे अपेक्षित असल्याने, तालुक्यामध्ये एका दिवशी जास्तीतजास्त दोन ग्रामसभा आयोजित करणे. | |
| १०. | विशेष ग्रामसभेसाठी सर्व विभागांचे, विशेषत: राज्य शासनाच्या विभागाकडील संबंधीत अधिकारी कर्मचारी उपस्थित राहून मोहीमेअंतर्गत सोपविलेली जबाबदारी पार पाडण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करणे. | |
| ११. | प्रत्येक ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेसाठी तालुकास्तरीय विस्तार अधिका-यांची संपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती करणे. | दि. १५ सप्टेंबर, २०१९ |
| १२. | या मोहीमे अंतर्गत नियुक्त करण्यात येणारे Facilitator, त्यांचे प्रशिक्षण, सर्वेक्षण तसेच RGSA अंतर्गत विविध प्रशिक्षण उपक्रम, ग्रामस्तरीय तीन सभा व विशेष ग्रामसभा इ. बाबींचे पर्यवेक्षण व सनियंत्रण करणे. | |
| १३. | जिल्हा स्तरीय नोडल अधिका-यांचा नियमित आढावा घेवून जिल्ह्यामध्ये मोहिम यशस्वी करणे. | मोहिम कालावधी |
| १४. | विशेष ग्रामसभेच्या निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार सन २०२०-२१ या वर्षाचा वार्षिक आराखडा मंजूर होताच त्या ग्रामपंचायतीने प्लॅन प्लस वर अपलोड करणे. | मोहिम कालावधी |

| | | |
|---|---|---|
| १५. | ग्रामपंचायतीमध्ये विहित नमुन्यातील माहिती फलक लावणे. (परिशिष्ट-२) | मोहिम कालावधी |
| १६. | माहिती फलकांचे जिओ-टॅग फोटोग्राफ अपलोड करणे. | मोहिम कालावधी |
| १७. | विशेष ग्रामसभा बैठकीचे जिओ-टॅग फोटोग्राफ अपलोड करणे. | मोहिम कालावधी |
| १८ | केंद्र शासनाने ग्रामपंचायतीसाठी विकसीत केलेल्या विविध आज्ञावली (www.gpdp.nic.in) अद्ययावत ठेवणे. | मोहिम कालावधी |
| १९. | या मोहिमेविषयी विहित अहवाल राज्य स्तरीय नोडल अधिका-यांकडे सादर करणे. | मोहिम कालावधी |

आपली,

( नीला रानडे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

निवड नस्ती (कार्यासन पंरा-६)

परिशिष्ट-१

## राज्य शासन व जिल्हा परिषदेच्या विविध विभागाच्या अधिकारी / कर्मचा-यांनी विशेष ग्रामसभेमध्ये सादर करावयाच्या माहितीचा नमुना

- विभागाचे नाव :
- विशेष ग्रामसभेस उपस्थित राहणा-या अधिकारी कर्मचा-याचे नाव :
- ग्रामपंचायतीचे नाव :
- विशेष ग्रामसभा दिनांक - वेळ- ठिकाण-

अ) विभागाच्या योजनांची माहिती

| अ.क्र. | योजनेचे नाव | योजनेअंतर्गत घेता येणारे उपक्रम | योजनेचे / लाभार्थी निवडीचे निकष | योजनेअंतर्गत मिळणा-या लाभाचे स्वरूप |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

ब) सन २०१९-२० मध्ये ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात हाती घेतलेल्या उपक्रमांचा तपशिल

| अ. क्र. | उपक्रमाचे नाव | लाभार्थींची नावे | उपक्रमाची सध्यस्थिती | | | उपक्रम अंमलबजावणी वेळापत्रक | | निधी विनियोग | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | उपक्रम पुर्ण | उपक्रम प्रगतीत | उपक्रम सुरू नाही | नियोजित वेळापत्रक | प्रत्यक्षात साध्याचे वेळापत्रक | मंजूर निधी (रू.) | खर्च निधी (रू.) |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |


क) सन २०२०-२१ मध्ये प्रस्तावित केलेले उपक्रम

| अ.क्र. | मागील वर्षी सूरू केलेले व प्रगतीत असलेले उपक्रम | हाती घ्यावयाचे नविन उपक्रम | प्रस्तावित नियोजन |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

वरील नमुन्यांमधील माहिती संबंधीत विभागाचे अधिकारी / कर्मचारी यांनी ग्रामपंचायतीस लेखी स्वरूपात देवून विशेष ग्रामसभेमध्ये सादर करावयाची आहे.

अधिकारी / कर्मचारी यांची स्वाक्षरी

महाराष्ट्र शासन



पंचायती राज

| | |
|---|---|
| ग्रामपंचायत : ...................................... | एल.जी.डी. कोड .................................. |
| तालुका : ...................................... | महसूली गावांची नावे ........................ |
| जिल्हा : ...................................... | एकूण लोकसंख्या .................................. |
| राज्य : ...................................... | अनु.जाती लोकसंख्या .................................. |
| संरपंचाचे नाव : ...................................... | अनु.जमाती लोकसंख्या.................................. |

# मंजूर वार्षिक आराखडा सन २०२०-२१

| अ.क्र. | योजनेचे नाव | उपक्रमाचे नाव | निधी |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |

| मिशन अंत्योदय सर्वेक्षणामधून निदर्शनास आलेल्या तफावती (Critical Gaps) |
|---|
| • |
| • |